**महाराष्ट्र राज्यात ८ जिल्हयात मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१९९०/सी आर-३८७/पदुम -१३**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-१७ डिसेबर, १९९२.**

वाचाः- १) केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाचे पत्र क्रमांक ११०१३/१/९०/एफवाय-३, दिनांक २४.१.१९९१.
२) मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई यांचे पत्र क्रमांक ०११३०१/१७०८९, दिनांक २४.१२.९०

प्रस्तावनाः-

लहान तळयात मत्स्यशेतीचा सर्वांगिण विकास करण्याचे दृष्टीने निवडक जिल्हयात मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा स्थापन करण्याची केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. मत्स्य उत्पादन हाती घेण्याचे दृष्टीने उपलब्ध असलेल्या जलक्षेत्रापैकी प्रथम एका निवडक भागातील काही तलाव निवडून त्यांच्या मत्स्य उत्पादनाच्या दृष्टीने सर्वांगिण विकास साधणे व त्यासाठी उपलब्ध अद्ययावत तांत्रिक ज्ञानाचा वापर करुन, आवश्यक सर्व साधनसामुग्रीचा पुरवठा करुन, तलावातील मत्स्य उत्पादन वाढविण्याचा कार्यक्रम या यंत्रणेमार्फत घेणे अपेक्षित आहे. मत्स्यउत्पादन वाढविण्याच्या दृष्टिने या यंत्रणेमार्फत कर्ज व अनुदान स्वरुपात अर्थसहाय्य दिले जाते. व सुधारित तंत्र शिकविले जाते. अशा त-हेने निवडलेला भाग विकसित होताच त्या भोवतालचा भाग क्रमशः या योजनेखाली आणून हळूहळू संपूर्ण भागाचा मत्स्यव्यवसायाच्या दृष्टीने सर्वांगिण विकास घडविला जात आहे.

या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत प्रथम यवतमाळ भंडारा, चंद्रपूर, नागपूर व गडचिरोली या जिल्हयात ही योजना राबविण्यात आली. उपरोक्त जिल्हयात यंत्रणा सरु केल्यानंतर प्रति हेक्टरी मत्स्य उत्पादनात भरीव प्रमाणात वाढ झाल्यामुळे शासनाने सन १९९१ मध्ये राज्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, परभणी, लातूर, बुलढाणा, अकोला, बीड या बिगर आदिवासी जिल्हयांत आणि ठाणे व अमरावती या आदिवासी जिल्हयात अशा एकूण १३ जिल्हयात यंत्रणा कार्यान्वित आहेत. केंद्र शासनाने त्यांचे क्र ११०१३/१/९०/एफवाय-३ दिनांक २४.१.१९९१ च्या पत्रान्वये राज्यात नांदेड,

जळगांव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद,वर्धा या बिगर आदिवासी जिल्हयात व धुळे या आदिवासी जिल्हयांत अशी एकूण ८ जिल्हयात  नवीन यंत्रणा स्थापण्यास मंजुरी दिली आहे.
अतः ही योजना उपरोक्त ८ जिल्हयात मंजूर करण्याचा प्रश्न
शासनाचे विचाराधीन होता

**शासन निर्णय :-**

केंद्र पुरस्कृत मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक,जालना, उस्मानाबाद व वर्धा या सात बिगर आदिवासी जिल्हयात स्थापन करण्यास शासन मंजूरी देत आहे. या यंत्रणा संस्था नोंदणी अधिनियम १८६० खाली नोंदणीकृत करुन स्वायत्त संस्था म्हणून कार्यरत राहतील.

२. या योजनेचे कार्यान्वयन मत्स्यव्यवसाय संचालनालया मार्फत होईल त्यासाठी प्रत्येक जिल्हयात प्रत्येक यंत्रणेसाठी खाली नमूद केलेली पदे दिनांक २८.२.१९९३ पर्यत मत्स्यव्यवसाय संचालनालयाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे.

| अ. क्र | पदनाम | वेतनश्रेणी | प्रत्येक जिल्हयातकरिता पद संख्या |
|---|---|---|---|
| १) | मुख्य कार्यकारी अधिकारी ( सहा.म.स.वर्ग-१) | २२००-७५-२८००-द.रो १००-४००० | १ |
| २) | सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी वर्ग -३ | १४००-४०-१८००द.रो-५०-२३०० | २ |
| ३) | वरिष्ठ लिपिक | १२००-३०-१६००-द.रो-४०-२०४ | १ |
| ४) | सर्वेक्षक वर्ग-३ | ९७५-२५-११५०-द.रो-३०-१५४० | १ |
| ५) | कनिष्ठ लिपिक टंकलेखक | ९५०-२०-११५०-द.रो. २५-१५०० | १ |
| ६) | वाहनचालक व स्वच्छक वर्ग | ९५०-२५-११५० द.रो. २५-१५०० | १ |
| ७) | मत्स्यक्षेत्रिक वर्ग-४ | ७७५-१२-९५५-द.रो. १५-१०३०-२०-११५० | २ |
| ८) | शिपाई वर्ग-४ | ७५०-१२-८७०-द.रो. १४-९४० | १ |

३. या यंत्रणेच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत करण्यासाठी प्रत्येक जिल्हयासाठी एक आढावा समिती त्या जिल्हयाती जिल्हयाधिका-याच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येत आहे. या समितीचे सदस्य खालीलप्रमाणे राहतील.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३) | प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक | सदस्य |
| ४) | जिल्हा/विभागीय मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचे चेअरमन | सदस्य |
| ५) | जिल्हा मध्यवती बॅन्केचे चेअरमन किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६) | प्रमुख्य बॅन्केचे (लिड बॅन्क ) जिल्हा व्यवस्थापक | सदस्य |
| ७) | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| ८) | जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य |
| ९) | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग (राज्य शासनाचा ) | सदस्य |
| १०) | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग (जिल्हा परिषद ) | सदस्य |
| ११) | मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीने दर तीन महिन्यांनी किमान एकदा यंत्रणेच्या कामाचा आढावा घेऊन आपला अहवाल शासनास आणि मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई यांना सादर करावा.

४. या संबंधिचा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली नोंदविण्यात यावा व शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि -१९९२/१९८/अर्थसंकल्प -१४, दिनांक १६.१२.१९९२ अन्वेय आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या रु ३५.०० लाख (रु पस्तीस लाख फक्त ) इतक्या अग्रीम रक्कमेतून भागविण्यात यावा. या यंत्रणावर येणा-या खर्चाचा राज्य शासनाचा व केंद्र शासनाचा हिस्सा सोबतच्या विवरणपत्र ‘‘अ’’ मध्ये दर्शविला आहे. यंत्रणेसाठी अर्थसहाय्याची पध्दत परिषिष्ट ‘‘ब’’ प्रमाणे राहील.

डी-८-२४०५-मत्स्यव्यवसाय-१०१ भुजलाशयीन मत्स्यव्यवसाय (दोन ) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (सी) (२४०५/०१६/४) मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा मत्स्यसंवर्धक विकास अभिकरण यंत्रणा (तीन) केद्र पुरस्कृत योजना (२४०५०८२५)

परि. १ मध्ये नमूद केलेल्य प्रत्येक नवीन यंत्रणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. मत्स्यव्यवसाय संचालक मुंबई यांना रुपये ३५.०० लाख एक रकमी आकस्मिक देयकावर अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्या कोषागारातून काढण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई यांनी आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व सवितरण

अधिका-यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबधीच्या आदेशात/ प्रपत्रात अग्रीम रक्कम खर्च करताना सादर करण्यात येणा-या देयकावर “आकस्मिकता निधीतून अग्रीम शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि -१९९२/१९८ अर्थसंकल्प-१४, दिनांक १६.१२.१९९२ अन्वये मंजूर केलेले” अशा स्पष्ट सूचना लाल शाईने अधोरेखित कराव्यात. त्याप्रमाणे शासन पत्र वित्त विभाग क्रमांक सीएनएफ-१९८३/१४०/बीयुडी- ३दिनांक २६ सप्टेंबर, १९८३ द्वारे केलेल्य सूचनांच्या अमंलबजावणी काटेकोरपणे करावी मत्स्यव्यवसाय संचालक, यांनी मंजूर अग्रीमातून प्रत्यक्ष खर्च केल्याची एकत्रित माहिती महिन्यानंतरच्या १५ तारखेपर्यत वित्त आणि कृषि व पदुम विभाग यांना पाठवावी.

६. मत्स्यव्यवसाय संचालकनी आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या अग्रीमाची प्रतीपुर्ती करण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव योग्य वेळी शासनास सादर करावा.

७. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र. १०४५/९२/व्यय-१, दिनांक ५.१२.१९९२ अन्वेय निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सौ. कांचन. विजयन )
कार्यासनअधिकारी, महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

प्रति,

१. मत्स्यव्यवसाय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई – २ ,
२. जिल्हाधिकारी,नांदेड,जळगाव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद, व वर्धा.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, जळगाव, अहमदनगर, नाशिक,जालना, उस्मानाबाद, व वर्धा.
४. सर्व प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक.
५. जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद,वर्धा.
६. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक जालना, उस्मानाबाद व वर्धा.

७. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद व वर्धा.
८. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद व वर्धा.
९. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद व वर्धा.
१०. अध्यक्ष, जिल्हा मत्स्यव्यवसाय व विकास सहकारी संघ, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद व वर्धा.
११. व्यवस्थापक जिल्हा लीड बॅंक, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद व वर्धा ( मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई यांचे मार्फत )
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा, नांदेड, जळगांव, अहमदनगर, नाशिक, जालना, उस्मानाबाद व वर्धा ( मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई यांचे मार्फत )
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. महालेखापाल १/२( लेखापरिक्षा ) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर.
१५. महालेखापाल-१/२,(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर.
१६. महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. वित्त विभाग (व्यय-१)/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१४, मंत्रालय, मुंबई.
१९. कार्यासन अधिकारी, पदुम-१२,पदुम-१४, कृषि व पदुम विभाग,मत्रालय, मुंबई.
२०. सचिव केंद्र शासन कृषि मंत्रालय (कृषि व सहकार विभाग ) कृषि भवन नवी दिली (पत्रान्वये )
२१. सह संचालक, लेखा व कोषागरे संगणक कक्ष नवीन प्रशासकीय भवन, ५वा मजला, मुंबई ( २ प्रती )
२२. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड, जळगाव, अहमदनगर, नाशिक,जालना, उस्मानाबाद, व वर्धा
२३. निवड नस्ती.